


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784
संपादक : जितेंद्र कायस्थ




वर्ष ३ रे अंक : २२१ वा शुक्रवार दि २४ ऑक्टोबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# रवींद्र धंगेकरांचा नवा बॉम्ब; मुरलीधर मोहोळांकडील ती इनोव्हा कोणाची? नवी कागदपत्रे समोर आणत गंभीर आरोप

**वृत्तसंस्था/ पुणे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे नेते आणि माजी आमदार   यांनी मागील काही दिवसांपासून भाजप नेते आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याविरोधात आरोपांचा राळ उठवली आहे. एकनाथ शिंदे यांनी सबुरीचा सल्ला दिल्यानंतर आणि पक्षाकडून कारवाईची चर्चा रंगल्यानंतरही धंगेकर हे थांबण्याचं नाव घेत नसल्याचं चित्र असून आता पुन्हा एकदा त्यांनी   वर गंभीर आरोप केला आहे. मोहोळ हे पुण्याचे महापौर असताना ते वापरत असलेली इनोव्हा कार ही एका बिल्डरची होती, असा दावा धंगेकरांनी केला आहे. मुरलीधर मोहोळांवर आरोप करताना रवींद्र धंगेकर यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटलंय की, पुणेशहराचे खासदार व केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा जैन होस्टेल खरेदी प्रकरणात सहभाग असल्याचे अनेक पुरावे पुणेकरांनी गेल्या काही दिवसात पाहिले आहेत. परंतु तरी देखील ते या सर्व गोष्टी योगायोग असलेले सांगतात. मी आपणास काही माहिति देऊ इच्छितो. मोहोळ हे खासदार होण्याच्या अगोदर पुण्यनगरीचे महापौर होते. हे महापौर असताना पुणे महानगरपालिकेची अधिकृत शासकीय पाटी लावून महापौर पांढऱ्या रंगाची इनोव्हा क्रिस्टा वापरायचे. त्या गाडीचा नंबर होता १२ ०९०९. ही गाडी ना मोहोळ यांची होती ना पुणे महानगरपालिकेचे शासकीय वाहन. ही गाडी होती कोथरूडच्या बढेकर बिल्डरची. हे तेच बिल्डर आहे ज्यांनी जैन होस्टेल खरेदी करण्यासाठी दोन नंबरचा लिलाव लावला आणि हे देखील पुन्हा मुरलीधर मोहोळ यांचे पार्टनर आहेत,ङ्कङ्क असा हल्लाबोल धंगेकर यांनी केला आहे. रवींद्र धंगेकर यांनी खासगी वाहनावरूनमुरलीधर मोहोळयांच्यावर प्रश्नांची सरबत्तीही केली आहे. ङ्कङ्कपुणे महानगरपालिकेत महापौर हे संविधानिक पद सांभाळत असताना एका खाजगी व्यावसायिकाचे वाहन वापरणे हे महापौरांच्या नीतिमत्तेला धरून आहे का? साडेनऊ हजार कोटींचे बजेट असलेल्या महापालिकेला महापौरांसाठी साधी गाडी घेता नाही आली का? या बिल्डरची गाडी वापरत असताना महापौरपदाचा वापर करून संबंधित बिल्डरला फायदा होतील असे किती प्रकल्प मंजूर करून देण्यात आले? विशेषतः कोथरूड भागात मोठ्या प्रमाणात सोसायटीचे पुनर्विकास प्रकल्प बढेकर बिल्डरला देण्यात आलेले आहेत. वेताळ टेकडी येथे टनेल,  रस्ता आणि बालभारती ते पौड फाटा लिंक रोड हा प्रोजेक्ट आणण्यासाठी माननीय इतके अतिउत्साही आहेत की, त्यांनी हजारो पर्यावरणवाद्यांचा विरोध पत्करला. तुम्हाला वाटेल की हे सर्व ते वाहतूक कोंडीतून मुक्तता व्हावी यासाठी करत आहेत. परंतु नाही. गोखले, बढेकर आणि आणखी तीन बिल्डर यांच्या जमिनी या भागात आहेत. वेताळ टेकडी परिसरात या बिल्डरांना प्रोजेक्ट करता यावेत, यासाठी त्यांनी हा घाट घातला आहे. अर्थात बिल्डर नावाला असतात हेच मालक असतात. आता हे शपथ पत्रात लीगल बिल्डर पार्टनरशिप दाखवतात तर अनधिकृत किती पार्टनरशिप असतील? याचा विचार न केलेला बरा, असा घणाघातही धंगेकरांनी केला ऐआहे.



दरम्यान, ङ्कङ्कया पुण्यनगरीच्या विकासात आजवर अनेक महापौरांनी योगदान दिले. परंतु यात अतिशय विक्रमी भ्रष्ट कारकीर्द राहिली ती विद्यमान खासदारांची. कुठल्याही कामाचे एक वर्षाचे टेंडर देण्याची पूर्वापार पद्धत बदलत ५/१०/१५/२० वर्षांचे टेंडर देण्यात आले. यामुळे महापालिकेची अतिशय दुरवस्था झाली ती यांच्या काळातच. असो, जैन बोर्डींग प्रकरणी व्यवहार रद्द झाला पाहिजे आणि ही जमीन लुटणाऱ्या प्रत्येकावर गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी रवींद्र धंगेकर यांच्याकडून करण्यात आली आहे. रवींद्र धंगेकर यांच्यासह इतर नेत्यांनी जैन बोर्डिंग जमिनीवरून केलेले आरोप मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकार परिषद घेऊन फेटाळून लावले आहेत. या प्रकरणात माझा कसलाही संबंध नसून राजकीय हेतूने हे आरोप केले जात असल्याचा दावा मोहोळ यांनी केला आहे.

# अभिता लँड प्रा.लि.चे सर्वेसर्वा सुनीलभाऊ शेळके यांची हॅलो बुलढाणा कार्यालयाला दिवाळी सदिच्छा भेट!

## वृत्त पोर्टलच्या वेगवान कार्याची प्रशंसा....

**जनसंचलन/बुलढाणा**

अभिता लँड प्रा.लि. सोल्युशनचे सर्वेसर्वा आणि जनतेच्या मनात आपली खास ओळख निर्माण केलेले सुनीलभाऊ शेळके यांनी आज दिवाळीनिमित्त हॅलो बुलढाणा सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन कार्यालयाला विशेष भेट देत सदिच्छा व्यक्त केल्या. या भेटीदरम्यान त्यांनी संपादक मंडळाशी संवाद साधत शेतकऱ्यांच्या विविध ज्वलंत विषयांवर सविस्तर चर्चा केली. ग्रामीण भागातील शेती, पाणीपुरवठा, आणि शेतकऱ्यांच्या उत्पादनांना न्याय्य बाजारभाव मिळावा यासाठी शासनाने राबवावयाच्या योजना यावरही त्यांनी आपली ठाम मते मांडली. हॅलो बुलढाणा या वृत्त पोर्टलची झपाट्याने वाढती लोकप्रियता,



जनसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडणारी पत्रकारिता आणि बातम्यांची सुपरफास्ट गती पाहून शेळके यांनी टीमचे कौतुक करत म्हणाले, आजच्या डिजिटल युगात हॅलो बुलढाणा सारखं निर्भींड आणि तत्परतेनं काम करणारे वृत्त पोर्टल दुर्मिळ आहेत.तुम्ही जिल्ह्याचा अभिमान आहात.फ्फ सुमारे  १९ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत पोहोचलेले हॅलो बुलढाणा आज बुलढाणा जिल्ह्यातील नंबर वन न्यूज पोर्टल म्हणून नावारूपास आले आहे. सत्य, वेग आणि जबाबदारी या तिन्ही घटकांवर आधारित पत्रकारितेमुळे जनतेचा विश्वास संपादन करणाऱ्या या पोर्टलला सुनीलभाऊ शेळके यांच्या विशेष भेटीमुळे नवी प्रेरणा मिळाली आहे. हॅलो बुलढाणाफ सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचा हा उत्साही आणि विश्वासार्ह प्रवास पुढेही असाच गतिमान राहील,असा निर्धार या प्रसंगी टीमने व्यक्त केला

# .... ट्रम्प यांची हडेलहप्पी....

## संपादकीय लेख

रशियाकडून तेल घेत असल्याच्या कारणावरून भारतावर अतिरिक्त २५ टक्के आयातशुल्क लागू करण्याच्या अमेरिकेच्या निर्णयावरील भारताने दिलेल्या प्रतिक्रियेचे सार तीन शब्दांत सामावणारे आहे. ते म्हणजे : अन्यायकारक, अयोग्य आणि अवास्तव.फ यात अतार्किक या आणखी एका शब्दाचा समावेश होऊ शकला असता; परंतु अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा आणि तर्काचा संबंध नसल्याने तो टाळला असावा. ट्रम्प यांच्या निर्णयात तर्कसंगती आणि विवेक नसतो, तर दंभ आणि सूडभावना असते. आपल्या व्यापारनीतीचा शस्त्र म्हणून उपयोग करीत ट्रम्प गेले सात महिने आयातशुल्करूपी शस्त्र डागत आहेत. आपल्याला अपेक्षित प्रतिसाद न देणाऱ्या भारतासारख्या देशाला दंड ठोठावण्याची त्यांची कृती ही सूडबुद्धीने केलेली कारवाईच आहे. दोन्ही देशांमधील व्यापार करारात अमेरिकेच्या मागण्यांना भारत दाद देत नसल्याने, रशियाकडून तेल न घेण्याबद्दल बजावूनही तसे करणे तो सोडत नसल्याने आणि पाकिस्तानबरोबरील युद्ध थांबविल्याचा दावा वारंवार करूनही तो मानत नसल्याने ट्रम्प महाशयांची भारतावर खप्पामर्जी झाली आहे. वास्तविक परराष्ट्र संबंध हे सर्वोच्च नेत्याच्या मर्जीवर नव्हे, तर दोन्ही देशांमधील दीर्घकालीन नाते आणि परस्पर हित यांवर अवलंबून असतात. मात्र, कोणत्याही परंपरांचा, संकेतांचा मुलाहिजा न बाळगणारे ट्रम्प आपल्या मर्जीबरहुकूम वागत आहेत. भारताला दुखावू नका, असा सल्ला त्यांच्याच रिपब्लिकन पक्षातील नेते देत असूनही, शहाणपणाचे चार शब्द ऐकण्याची त्यांची तयारी नाही. परिणामी, दोन्ही देशांमधील संबंध कधीही नव्हते इतके खराब झाले आहेत. यातून मार्ग काढण्याचे मोठे आव्हान भारतासमोर आहे. भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या मालावर २५ टक्के आयातशुल्क लागू करण्याचा निर्णय जाहीर झाला तेव्हाच, रशियाकडून तेल घेत असल्याबद्दल दंड आकारण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली होती. त्यामुळे २५ टक्के अतिरिक्त शुल्काचा नवा निर्णय अनपेक्षित नाही. दंडाच्या धमकीमुळे भारत अपेक्षित प्रतिसाद देईल काय, याची चाचपणी ट्रम्प करीत होते. वास्तविक रशियाकडून केवळ भारतच नव्हे, तर अन्य देशही तेल खरेदी करीत आहेत. चीन त्यात आघाडीवर आहे. युरोपीय महासंघही रशियाकडून इंधन घेत आहे. खुद्द अमेरिकाही रशियाकडून युरेनियम; तसेच खते आयात करीत आहे. अमेरिका आणि रशिया यांच्यातील व्यापारातील वार्षिक वाढ २३ टक्क्यांवर गेली आहे. असे असताना ट्रम्प यांनी केवळ भारताला लक्ष्य केले. दोन महिन्यांपूर्वी त्यांनी चीनला लक्ष्य करताना चिनी मालावर १४५ टक्के आयातशुल्क लागू केले होते. मात्र, त्यानंतर चीनने अमेरिकेला संरक्षण तंत्रज्ञानासाठी आवश्यक असलेल्या दुर्मीळ धातूंची निर्यात थांबविण्याचा पवित्रा घेतला. मग ट्रम्प यांनी नमते घेऊन आयातशुल्क ३० टक्क्यांपर्यंत खाली आणले. भारताला मात्र नमवू, असे ट्रम्पना वाटत असावे. रशियाकडून तेल खरेदी करणे भारताने थांबविल्यास आखाती देशांकडून तेल घ्यावे लागेल. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे भाव वाढणार आहेत. अमेरिकी तेल कंपन्यांसाठी ट्रम्प यांना ही महागाई हवी असावी. त्यामुळे ते भारतावर दबाव आणत आहेत. या दबावापुढे न झुकणेच योग्य ठरेल. त्यामुळे भारताने आता घेतलेली भूमिका कायम ठेवायला हवी. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वक्तव्यही याला पूरक असे आहे. भारत-अमेरिका व्यापार करारात शेतमालाचा मुद्दा कळीचा आहे. शेतकऱ्यांच्या हिताला बाधा येईल असे कोणतेही कृत्य आपण करणार नसल्याचे मोदी यांनी म्हटले आहे. यासाठी किंमत मोजण्याची तयारी असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. पंतप्रधानांचे वक्तव्य योग्यच आहे; परंतु ते कृतीत येण्यासाठी योजना हव्यात. पर्यायी नीती हवी. भारतीय मालांवर पुढील महिन्यापासून अमेरिका पन्नास टक्के शुल्क आकारेल. त्यामुळे तेथील बाजारपेठेत भारतीय वस्तू महाग होतील. त्याचा फायदा अन्य देश उठवतील. यामुळे भारतीय निर्यातदारांत अस्वस्थता निर्माण होणे स्वाभाविक आहे. अशा स्थितीत अन्य देशांतील बाजारपेठा हेरून निर्यात वाढवावी लागेल. काँग्रेसचे नेते शशी थरूर यांनी अमेरिकी मालांवरही ५० टक्के शुल्क आकारण्याचा सल्ला दिला आहे. त्याची व्यवहार्यता तपासून पाहावी लागेल. अन्य देशांबरोबरील संबंध दृढ करावे लागतील




# ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयात दिवाळी उत्सव

**जनसंचलन/ खामगाव**

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, रायगड कॉलनी येथे मंगळवार, २१ ऑक्टोबर रोजी सकाळी दिवाळी उत्सव भक्तिपूर्वक साजरा करण्यात आला. यावेळी सेवा केंद्राच्या संचालिका शकुंतला दीदी यांनी उपस्थितांना दिवाळीचे आध्यात्मिक रहस्य सांगितले. त्या म्हणाल्या, निराकार शिव परमात्मा धरतीवर अवतरित होऊन सतयुगाची स्थापना करीत आहेत. आपण सर्व शरीराला चालवणारी एक चेतनशक्ती आत्मा आहोत. आत्मा समजून शरीराच्या माध्यमातून कर्म करणे आणि आत्मज्योत जागृत करणे म्हणजेच खरी दिवाळी साजरी करणे होय. यावेळी स्वर्णिम युगाच्या आगमनाचा संदेश देण्यासाठी ब्रह्मकुमारी परिवाराने दिवाळीच्या पावन पर्वावर विशेष देखावा सादर केला. यामध्ये राधेच्या भूमिकेत परी वाघमारे, कृष्णाच्या भूमिकेत योगेश कुमठे, लक्ष्मीच्या भूमिकेत श्रुतिका निकम, आणि नारायणाच्या भूमिकेत ईश्वरी राखोंडे सहभागी झाले होते. दिवाळी उत्सवाच्या वेळी लक्ष्मीचे पूजन आणि महाआरती करण्यात आली. यावेळी ॲड. अमोल अंधारे यांच्या हस्ते लक्ष्मीपूजन तसेच आरती करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांना दिवाळीच्या शुभेच्छा देणारे काईस तसेच प्रसाद वाटण्यात आले.

# अपघातातील जखमी आजोबाचाही मृत्यू

**जनसंचलन/ नांदुरा**

जळगाव जामोद-नांदुरा रस्त्यावर दोन दुचाकींच्या समोरासमोर झालेल्या अपघातात जखमी झालेल्या आजोबांचा मृत्यू झाला आहे. ही दुर्घटना ९ ऑक्टोबर रोजी सकाळी निमगावजवळील कुलकर्णी यांच्या मळ्याजवळ घडली होती. या अपघातात त्यांचा दोन वर्षांचा नातू, यश मनोज ठाकरे याचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. निमगाव येथील रामदास नामदेव ठाकरे हे एमएच २८ बीएफ ६६९० या दुचाकीवरून शेतातून घरी येत होते. त्याच वेळी समोरून येणाऱ्या दुचाकीस्वाराने त्यांना जबर धडक दिली होती.

# समृद्धी महामार्गावर दोन अपघातांत एक ठार, महिला गंभीर जखमी...

**जनसंचलन/मलकापूर पांग्रा**

समृद्धी महामार्गावर मंगळवारी (दि.२२) घडलेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांत एकाचा जागीच मृत्यू झाला, तर एका महिलेची प्रकृती गंभीर आहे. पहिल्या अपघातात ट्रकचे टायर तपासत असताना क्लीनर स्वतःच्याच वाहनाखाली सापडून ठार झाला, तर दुसऱ्या घटनेत भरधाव कारने कंटेनरला मागून जोरदार धडक दिल्याने महिला गंभीर जखमी झाली. पहिल्या अपघातात कोलकात्याहून मुंबईकडे जाणारा ट्रक (क्र. डब्ल्यूबी २५ एल ६२५६) चालक अयुब अली मंडल (वय अंदाजे ३५, रा. पश्चिम बंगाल) यांनी चॅनल क्रमांक ३२१.३ वर वाहन थांबवून टायर तपासणी सुरू केली. त्याच वेळी क्लीनर शाहरुला मंडल (रा. पश्चिम बंगाल) हा मागील टायरखाली येऊन जागीच ठार झाला. घटनेची माहिती मिळताच किनगाव राजा पोलिस ठाण्याचे एपीआय संदीप इंगळे, पोलिस कॉन्स्टेबल गणेश उबाळे, अरुण भुतेकर तसेच १०८ ॲम्ब्युलन्स चालक प्रदीप पडघान व डॉ. स्वप्निल सुसर यांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह बिबी येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. ट्रक बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली. दुसऱ्या अपघातात समृद्धी महामार्गाच्या चॅनल क्रमांक २९८ वर मुंबईवरून नागपूरकडे जाणारी कार (क्र. एमएच ०२ जीपी ११३०) समोरील कंटेनरला (क्र. एमएच ४८ डीसी २१३७) मागून जोरदार धडकली. या अपघातात कविता हुंगे (वय ५०) ही महिला गंभीर जखमी झाली असून, रुग्णवाहिकेद्वारे त्यांना मेहकर येथील सरकारी रुग्णालयात हलविण्यात आले. १०८ या घटनेचा पुढील तपास मेहकर पोलिस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत. अपघातग्रस्त वाहन बाजूला करून महामार्गावरील वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# शहरी नक्षलवाद हे नव्या युगातील सर्वात मोठं आव्हान, तर काँग्रेस अल्ट्रा लेफ्टि : फडणवीस

**नागपूर :** महाराष्ट्रात नक्षलवाद जवळपास संपुष्टात आला आहे आणि छत्तीसगडमधूनही तो लवकरच हद्दपार होईल. मात्र आता बंदुकीच्या नक्षलवादापेक्षा अधिक घातक असा शहरी नक्षलवाद उदयास आला आहे. हा नक्षलवाद बिनचेहऱ्याचा, विचारांच्या माध्यमातून पसरवला जाणारा आणि तरुण पिढीला अराजकतेकडे नेणारा आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नागपुरात पत्रकारांशी झालेल्या अनौपचारिक भेटी दरम्यान ते बोलत होते.

त्यांनी सांगितले की, ङ्कजेन झी अर्थात नव्या पिढीला दिशाभूल करून संविधान आणि संवैधानिक संस्थांवरील विश्वास डळमळीत करण्याचा प्रयत्न शहरी नक्षलवादी करत आहेत. हे सरकारपुढील सर्वात मोठं चॅलेंज आहे. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या ताकदीवर आम्ही या अराजकतावाद्यांचा निश्चित पराभव करू. बंदुकीच्या नक्षलवादात शत्रू कोण हे स्पष्ट असते, पण शहरी नक्षलवाद बिनचेहऱ्याचा आहे. हे लोक वेगवेगळ्या रूपात समाजात वावरतात आणि विषारी विचार पेरतात. त्यांच्या विरोधात लढा देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे.ङ्कमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस आणि खासदार राहुल गांधी यांच्यावरही यावेळी जोरदार टीका केली. ङ्कआमच्या विरोधकांमध्ये काँग्रेस हा मोठा पक्ष आहे, परंतु आज ती पक्षसंस्था 'अल्ट्रा लेफ्टिस्ट' विचारसरणीने ग्रस्त झाली आहे. इंदिरा गांधींच्या काळातही असे घडले नव्हते. मात्र राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेस फक्त 'डिस्ट्रक्टिव' म्हणजे विध्वंसक मुद्दे उचलत आहे. ते सरकारवर नव्हे तर संविधानिक संस्थांवर हल्ला करत आहेत, जे लोकशाहीसाठी



अधिक घातक आहे,ङ्क असा आरोप त्यांनी केला.आज भारताच्या राजकारणात विरोधकांनी स्वतःचा पुनर्विचार करण्याची गरज आहे.

देशाच्या प्रगतीच्या वाटचालीत बांधणीकारक भूमिका घेण्याऐवजी विरोधक फूट पाडणारी भूमिका घेत आहेत.ङ्क असेही फडणवीस म्हणाले. जातीय राजकारणावर भाष्य करताना त्यांनी म्हटले, जात जनतेच्या मनात नाही, ती नेत्यांच्या मनात असते. निवडणुका आल्या की त्यांची जात बाहेर पडते. पण जनता आता जागृत आणि समजूतदार झाली आहे.

म्हणूनच जनतेने नेहमीच मला पाठिंबा दिला आहे. मतदार याद्यांतील त्रुटींबाबत बोलताना फडणवीस म्हणाले, 'मतदार याद्यांमधील घोळ हे काही आजचे प्रकरण नाही. मी २०१२ पासून या संदर्भात उच्च न्यायालयात याचिकाकर्ता आहे. त्याचा अजून निकाल लागला नाही, हे ग्रामीण भागात नाही तर शहरी भागात जास्त आहे. जर दोन तीन ठिकाणी नाव असताना एकापेक्षा जास्त ठिकाणी मतदान केले हे विरोधकांनी दाखवून द्यावे, कारण असे घडत नाही. आमच्याकडे आमचे विरोधक ज्या मतांवर निवडणून येतात, त्या घटकांच्या मतदार याद्या कशा सदोष आहेत, त्याचे पुरावे आमच्याकडे आहे. योग्यवेळी आम्ही त्या याद्या समोर आणू', असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## भंडारा भाजपमध्ये गटबाजी थांबवा, ती संपवा : चंद्रशेखर बावनकुळे

**भंडारा :** लोकसभा निवडणुकीत पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये अतिआत्मविश्वास दिसून आला. काहीतरी गडबड असल्याचे दिसून आले. कार्यकर्ते त्यांच्या कामात कमी पडत होते आणि गटबाजी उदयास येत होती. भंडारा भाजपमधील गटबाजी लपून राहिलेली नाही. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीपूर्वी ती संपवणे महत्त्वाचे आहे. तरच विजय मिळेल, असे आवाहन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.भंडारा येथे गुरुवारी आयोजित करण्यात आलेल्या भाजपच्या दिवाळी मेळाव्यात ते बोलत होते.

व्यासपीठावर पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार परिणय फुके, माजी खासदार सुनील मेंढे, जिल्हाध्यक्ष आशू गोंडाणे आणि भाजप नेते जॅकी रावलानी उपस्थित होते.बावनकुळे म्हणाले, लोकसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांमध्ये अतिआत्मविश्वास दिसून आला. पराभवाचा परिणाम सुनील मेंढे यांच्यावर झाला नाही, परंतु पक्षाचे नुकसान झाले. त्याचे परिणाम सर्वांना स्पष्ट आहेत. लोकसभा निवडणुकीच्या निकालांनी भीती निर्माण केली. यानंतर कार्यकर्त्यांनी आत्मविश्वासाने विधानसभा निवडणूक लढविली. परिणामी, साकोलीमध्ये नाना पटोले यांचा केवळ २०८ मतांनी विजय झाला, असेही त्यांनी सांगितले.कुणी नेता असल्याने त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना किंवा पत्नीला तिकीट मिळणार नाही . जर त्यांनी ५१ टक्के मतांची हमी दिली तरच पक्ष त्यांना तिकीट देईल. बावनकुळे यांनी सर्वांना पक्षातील गटबाजी टाळण्यासाठी शपथ घेण्याचे आवाहन केले .भाजपने भंडारा, पवनी, साकोली आणि तुमसर या चारही नगरपरिषदांमध्ये स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

## जर कोणाला खुमखुमी असेलच तर धनुष्यबाण कसा..

### कोकणात उदय सामंतांकडून भाजप-राष्ट्रवादीचा समाचार

**रत्नागिरी :** कोकणात नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहेत. याच पार्श्वभूमीवर शनिवारी चिपळूण येथील शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत शिवसेनेचे नेते पालकमंत्री उदय सामंत महायुती मधील रत्नागिरी जिल्ह्यातील भाजपा व राष्ट्रवादीच्या नेत्यांना खडे बोल सुनावले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजितदादा पवार हे महायुती म्हणून निवडणुका लढवायच्या आहेत असं सांगत असतानाच महायुतीमधीलच काही पिल्लावळ महायुती होऊ नये म्हणून प्रयत्न करत असतील तर माझी शिवसेनेच्या सगळ्या पदाधिकाऱ्यांना विनंती आहे की शिवसेना काय आहे हे तितक्याच आक्रमकपणे दाखवून देण्याची जबाबदारी तुमची आमची सगळ्यांची आहे अशा शब्दात उदय सामंत यांनी जिल्ह्यातील महायुतीमधील काही पदाधिकाऱ्यांच्या समाचार घेतला आहे. जर कोणाला खूमखुमी असेलच तर आपल्या धनुष्यबाण कसा चालतो हे त्यांना दाखवावे लागेल अशा शब्दात सामंतांनी सुनावले आहे.



चिपळूण मधील महायुतीमधील काही म्हणत आहेत की, आम्ही स्वबळावर लढणार आहोत आम्ही जिंकलेलो आहोत, आमच्याकडे ही संस्था आहे. आमच्याकडे ती संस्था आहे आमच्याकडे तीस हजार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलो आहोत. तर काही म्हणतात शाळांमधून २८ हजार जणांपर्यंत पोहोचलो आहोत माझी आपल्याला विनंती आहे की आपण महायुती म्हणूनच निवडणूक लढवायची आहे पण जर कोणाला खूमखुमी असेलच तर आपल्या धनुष्यबाण कसा चालतो हे त्यांना दाखवावे लागेल अशा शब्दात सामंतांनी सुनावले.

विधानसभेच्या निवडणुकीला जर शिवसैनिकांनी प्रामाणिकपणे काम केलं नसतं तर काय परिस्थिती झाली असती हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीलाही माहिती आहे निवडून आलेल्या उमेदवारांना ही माहिती आहे आणि आपल्या सगळ्यांना देखील माहिती आहे असा टोला त्यांनी चिपळूण येथील आमदार शेखर निकम यांना लगावला.अलीकडेच काही दिवसापूर्वी महाविकास आघाडी मधून विधानसभेला निवडणूक लढवलेले प्रशांत यादव यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे त्यांनाही सामंतांनी खडे बोल सुनावले आहेत.

# अंबरनाथमध्ये हार्ट अटॅकने महिलेचा मृत्यू, शिंदेंच्या सोहळ्याला रुग्णवाहिका नेल्याने उपलब्ध न झाल्याचा आरोप

**ठाणे :** अंबरनाथ येथील एका ६६ वर्षीय महिलेला हृदयविकाराचा तीव्र धक्का बसल्याने तातडीने शासकीय उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं, मात्र उपचारासाठी पुढील रुग्णालयात हलवण्याआधीच तिची प्राणज्योत मालवली. रविवारी संध्याकाळी हा प्रकार घडला. या प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नाट्यगृहाच्या लोकार्पणाच्या कार्यक्रमासाठी रुग्णवाहिका वापरण्यात आल्याने ती वेळेवर उपलब्ध होऊ न शकल्याचा आरोप करण्यात येत आहे. रुग्णालयाने मात्र सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ शहरातील स्वामी नगर येथील ६६ वर्षीय



मीना सूर्यवंशी यांना रविवारी रात्री हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना गंभीर अवस्थेत छाया उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी डॉक्टरांनी त्यांना ठाणे किंवा मुंबई येथील रुग्णालयात हलवण्याची गरज असल्याचे सांगितले.दरम्यान, रुग्णवाहिका तत्काळ उपलब्ध झाली नसल्याने सूर्यवंशी यांचा मृत्यू झाल्याचा दावा त्यांच्या नातेवाइकांनी केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते अंबरनाथ येथे धर्मवीर आनंद दिघे नाट्यमंदिराचा लोकार्पण सोहळा झाला.


या कार्यक्रमासाठी रुग्णवाहिका वापरण्यात आल्यामुळे ती सूर्यवंशींना वेळेवर उपलब्ध होऊ शकली नाही, असा गंभीर आरोप केला जात आहे.या आरोपांवर रुग्णालयाच्या प्रभारी अधीक्षक डॉ. शुभांगी वाडेकर यांनी सांगितले की, 'मीना सूर्यवंशी यांना रुग्णालयात आणण्यात आलं, तेव्हाच त्यांची स्थिती गंभीर होती. आवश्यक प्राथमिक उपचार करण्यात आले, तसेच रुग्णवाहिका उपलब्ध करण्याचे प्रयत्न सुरु होते. मात्र, १५ मिनिटांच्या आतच त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे रुग्णवाहिका वेळेवर मिळाली नाही, हा आरोप तथ्यहीन आहे'. अंबरनाथ पश्चिम भागातील सर्कस मैदान येथे धर्मवीर आनंद दिघे नाट्यमंदिराचे लोकार्पण रविवारी शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी अशोक सराफ, महेश कोठारे, उषा नाडकर्णी, अलका कुबल, मकरंद अनासपुरे, विजय पाटकर, विजय गोखले, सिद्धार्थ जाधव, विशाखा सुभेदार, संतोष जुवेकर, अशोक पत्की, अशोक समेळ, मंगेश देसाई यासारखे दिग्गज कलाकार उपस्थित होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पुण्यात भाजप नेत्यांमधला ऑनलाईन वाद पोहचला थेट पोलीस स्टेशनात

**पुणे :** सत्ता स्थापनेसाठी विरोधकांना आपल्या बाजूला ओढण्याचे धोरण अवलंबणाऱ्या भाजपमध्येच आता अंतर्गत संघर्षाचे ढग दाटले आहेत. राष्ट्र वादीचा पारंपरिक गड मानल्या जाणाऱ्या पुणे जिल्ह्यात भाजपला आपले अस्तित्व अधिक मजबूत करायचे असले, तरी स्थानिक स्तरावर वाढत्या गटबाजीमुळे पक्षात अस्वस्थता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे हा संघर्ष आता थेट पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.राजगड तालुक्यातील भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सचिव शुभम बेलदरे यांनी तालुकाध्यक्ष राजू रेणुसे यांच्या विरोधात वेल्हे पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. १९ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेल्या या तक्रारीत बेलदरे यांनी रेणुसे यांच्यावर फोनवरून दमदाटी, शिवीगाळ आणि मानसिक त्रास दिल्याचा गंभीर आरोप केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी भाजपच्या वतीने तालुक्यात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, या बैठकीचा संदेश बेलदरे यांना न मिळाल्यामुळे त्यांनी अधिकृत पक्षाच्या सोशल मीडिया ग्रुपवर नाराजी व्यक्त केली. त्यानंतर दोघांमध्ये तीव्र वाद झाल्याचे समोर आले आहे. या वादात रेणुसे यांनी अवमानकारक भाषा वापरल्याचा आरोप बेलदरे यांनी आपल्या तक्रारीत केला आहे.याबाबत तालुकाध्यक्ष राजू रेणुसे यांनी आपल्यावरील सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, ङ्गबैठकीचा संदेश चार दिवस आधीच ग्रुपवर टाकण्यात आला होता. पक्षातील प्रत्येक सदस्याला तोच संदेश मिळाला. कुणालाही वेगळा फोन करून कळविण्यात आले नव्हते. बेलदरे यांचे आरोप पूर्णपणे खोटे आहेत, असे त्यांनी सांगितले.या



तक्रारीमुळे भाजपच्या स्थानिक पातळीवरील अंतर्गत गटबाजी पुन्हा एकदा उघड झाली आहे. काही कार्यकर्त्यांनी या घटनेबाबत नाराजी व्यक्त केली असून, ङ्गपक्षातील मतभेद सार्वजनिकपणे समोर आणणे ही पक्षशिस्तीविरोधी कृती आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

पक्षाचे काही ज्येष्ठ नेते मध्यस्थी करण्याच्या प्रयत्नात असून, परिस्थिती हाताळण्यासाठी जिल्हा नेतृत्व स्वतः हस्तक्षेप करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. मात्र, या घटनेमुळे पक्षातील एकजुटीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक कार्यकर्त्यांमधील या मतभेदांमुळे आगामी निवडणुकीत संघटनेचे कामकाज आणि प्रचाराची दिशा प्रभावित होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.दरम्यान, वेल्हे पोलिसांनी सांगितले की, ङ्गही तक्रार पक्षांतर्गत वादातून उद्भवलेली आहे. प्राथमिक चौकशी सुरू असून, दोन्ही पक्षांचे जबाब घेतले जात आहेत.ङ्ग तपासानंतर पुढील कारवाई निश्चित केली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले. राजगड तालुक्यातील भाजप संघटनेत निर्माण झालेल्या या गोंधळामुळे जिल्हा स्तरावर खळबळ माजली आहे. पक्षांतर्गत तणावाचा हा प्रसंग केवळ वैयक्तिक वादापुरता मर्यादित राहतो की तो पुढे मोठ्या राजकीय संघर्षात परिवर्तित होतो, हे आगामी काही दिवसांत स्पष्ट होईल.

## पैसे देण्यास उशीर, पंपावर पेट्रोल भरण्यास गेला असता हल्ला

**नागपूर :** अवैध सावरकाने केलेल्या हल्ल्यात एका युवकाचा मृत्यू झाला आहे. या घटनेने संतप्त युवकाच्या नातेवाइकांनी युवकाच्या मृतदेहासह पोलिस ठाण्यावर धडक दिली. त्यामुळे नवीन कामठीत तणाव निर्माण झाला. पोलिसांनी ठोस कारवाईचे आश्वासन दिल्याने तणाव निवळला. नीतेश श्याम लाल शिरसाम (वय ३३ रा. गवळीपुरा, कामठी) असं मृतकाचं तर आशिष मेंढे, असं सावरकाराचं नाव आहे. मारहाण प्रकरणात पोलिसांनी आशिष याला अटक केली होती. सध्या तो न्यायालयीन कोठडीअंतर्गत कारागृहात आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नीतेश याचा गोयल टॉकीज परिसरात पानीपुरीचा ठेला आहे. फेब्रुवारी महिन्यात त्याने एका महिलेच्या माध्यमातून आशिष याच्याकडून १० हजार रुपये उधार घेतले. नीतेश हा आशिष याला दर महिन्याला थोडी-थोडी रक्कम परत करायचा. काही महिन्यांपासून व्यवसाय मंदावल्यानं तो आशिष याला पैसे देऊ शकला नाही. १२ ऑक्टोबरला आशिष हा चार साथीदारांसह नीतेशच्या घरी आला. त्याने त्याच्याकडून पैसे व दुचाकी वाहन मागितलं. नीतेशने गयावया करीत लवकरच पैसे परत करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर नीतेशला धमकी देत आशिष हा साथीदारांसह तेथून परत गेला.सायंकाळी नितेश हा दुचाकी वाहनात पेट्रोल भरण्यासाठी पंपावर गेला. येथे मेंढे याने नीतेशवर चाकूने हल्ला केला व पसार झाला. नीतेश याला मेयो हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान गुरूवारी नीतेश याचा मृत्यू झाला. नातेवाइक व परिसरातील नागरिक आशिषचा मृतदेह घेऊन थेट जुनी कामठी पोलिस स्टेशनमध्ये धडकले. आशिषविरूद्ध कठोर कारवाईची मागणी केली. पोलिसांनी त्यांना ठोस कारवाईचे आश्वासन दिले. त्यानंतर तणाव निवळला.

## 'पत्नीला संपवलं आता मी जीव देतोय'

**रायपूर :** एका व्यक्तीने आपल्या पत्नीची हत्या करुन आपल्या आयुष्याची अखेर केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. छत्तीसगडमधील धमतरी जिल्ह्यातील हरदी गावात ही दुःखद घटना घडली आहे. येथे २२ वर्षीय हितेश यादव उर्फ हिमत याने त्याची २० वर्षीय पत्नी लक्ष्मी यादव हिची गळा आवळून हत्या केली. त्यानंतर त्याने स्वतःही गळफास घेत आपला जीव दिला. मंगळवारी (२१ ऑक्टोबर) सकाळी कुटुंबातील सदस्यांनी दार ठोठावले, परंतु कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने ही घटना उघडकीस आली. हितेशचा मोठा भाऊ गीतेश्वर यादव याने खिडकीतून पाहिले तेव्हा लक्ष्मी जमिनीवर पडलेली आणि हितेश छताला गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. कुटुंबाने तात्काळ दरवाजा तोडून पोलिसांना याची माहिती दिली. पोलिस आणि फॉरेन्सिक पथकं घटनास्थळी पोहोचली आणि मृतदेह शवविच्छेदन तपासणीसाठी पाठवले आहेत.

## रस्त्याच्या मधोमध प्राण्याचं काळीज ठेवून अघोरी प्रकार

**कोल्हापूर :** कोल्हापूरच्या हातकणंगले तालुक्यातील इंगळी गावात दिवाळीच्या मध्यरात्री भानामतीचा भयानक प्रकार उघडकीस आला आहे. गावाच्या मुख्य कमानीखाली रस्त्याच्या मध्यभागी जनावराचं काळीज पांढऱ्या कापडावर ठेवून, त्याभोवती केळी, कुंकू-गुलाल, लिंबू व केळ्याच्या डहाळ्या यासारखी अघोरी पूजा करण्यात आली होती. या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे.दिवाळी पाडव्याच्या दिवशी सकाळी काही नागरिकांना गावच्या वेशीवर स्वागत कमानीच्या अगदी खाली रस्त्याच्या मधोमध काही गोष्टी ठेवल्याचे निदर्शनास आले. यामध्ये केळीचे झाड, त्या पुढे मांडलेली काही केळी आणि त्याच्या पुढे पांढऱ्या कापडावर जनावराचं काळीज, लिंबू, त्यावर कुंकू-गुलाल टाकले होते. बघता बघता ही घटना वाऱ्यासारखी पंचक्रोशीत पसरली.याबाबत माहिती मिळताच हुपरी पोलिसांनी घटनास्थळी त्वरित धाव घेतली. पंचनामा करत ठेवलेले सर्व साहित्य पोलिसांनी ताब्यात घेतलं. तसेच परिसरातील लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे तपास सुरु केला. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील फुटेजमध्ये आठ ते दहा तरुणांना मध्यरात्री गावातील मुख्य रस्त्यावर फिरताना आणि हे साहित्य ठेवताना दिसले.

या फुटेजच्या आधारे पोलिसांनी काही संशयितांकडे चौकशी सुरु केली आहे. प्राथमिक चौकशीत संशयितांनी हा प्रकार प्रँक म्हणून केल्याचं सांगितल्याची माहिती मिळत आहे. पण तपास अजूनही सुरू असल्याने तपासाअंतीच अंतिम निष्कर्ष दिला जाणार आहे, असे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रामस्थांसह अंधश्रद्धा निर्मूलन समितीनेही या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला असून अंधश्रद्धा निर्माण करणाऱ्या कृत्यांना आळा घालण्यासाठी कठोर पोलीस कारवाईची मागणी केली आहे.

## छेडछाडीची तक्रार का दिली?', बेदम मारहाण करत तरुणाला संपवलं

**वाशिम :** दिवाळी पाडव्याच्या दिवशी वाशिम जिल्ह्यातील आमखेड गावात गैरकायद्याची मंडळी जमवून एका व्यक्तीची हत्या करण्यात आली आहे. 'पोलीस ठाण्यात छेडछाडीची तक्रार का दिली?' म्हणत दोन गटात झालेल्या वादात एका व्यक्तीचा मृत्यू तर तीन जण जखमी झाले आहेत. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी फुलायंती नेमीचंद चव्हाण (वय ५२) यांनी जऊळका पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून फुलायंती यांच्या सवतीची मुलगी रंगीलानं छेडछाडीची तक्रार पोलिसांत का दिली? या कारणावरून आरोपी दादाराव पवार याने त्याच्या साथीदारांच्या मदतीनं जीव घेण्याच्या





उद्देशाने चाकू आणि दगडाने मारहाण केली. यात फिर्यादी फुलायंती हिचा मुलगा अविनाश हा गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला तर पती, दुसरा मुलगा आणि सून गंभीर जखमी झाले.आरोपींनी मारहाण करून स्वतःच्या दोन दुचाकी घटनास्थळी सोडून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच जऊळका पोलिसांनी घटनास्थळ गाठून घटनास्थळाचा पंचनामा करून जखमींना उपचार्थ वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलं. स्वाती चव्हाण, संदेश नेमीचंद चव्हाण, नेमीचंद चव्हाण असं जखमींचे नाव असून त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनास्थळी पोनी शेळके, एस.डी. पी.ओ पाडवी, अप्पर पोलीस अधिक्षक यांनी भेट देऊन जलद गतीने आरोपी पकडण्याच्या सूचना दिल्या.घटनेतील आरोपी राजु रामचंद्र पवार (रा. गिव्हा कुटे), दादाराव गंभीर पवार (रा. वाघी बु.), पवन गजानन चव्हाण (रा. बोराळा धनगर), अजय गजानन चव्हाण (रा. बोराळा धनगर), अशोक रामचंद्र पद्मार (रा. वाघी बु.) यांच्या विरुद्ध अप. नं. कलम २७२/२५ कलम १०३,१०९,१८९(२), १९१(२) १९१(३), १९० इछड इछड जुनी कलम ३०२, ३०७, १४३, १४७, १४८, १४९ भादंवीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध जऊळका पोलीस करत आहेत. ऐन दिवाळी सणात ही घटना घडल्यानं सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भारतानं न्यूझीलंडचा पराभव करत सेमी फायनलचं तिकीट केलं पक्कं

**नवी दिल्ली :** भारतीय महिला क्रिकेट संघानं महिला वनडे वर्ल्डकप २०२५ मधील सेमी फायनलचं आपलं स्थान पक्कं केलं आहे. गुरूवारी मुंबईत झालेल्या सामन्यात भारतानं न्यूझीलंडचा डीएलएस नियमानुसार ५३ धावांनी पराभव केला. या सामन्यात पावसाचा व्यत्यय आला होता. त्यामुळं न्यूझीलंडला ४४ षटकात ३२५ धावांचे आव्हान मिळाले होते मात्र न्यूझीलंडला ८ बॅटर्सच्या मोबदल्यात २७१ धावाच करता आल्या.

महिला वनडे वर्ल्डकपमध्ये ऑस्ट्रेलिया, दक्षिण अफ्रिका आणि इंग्लंड हे संघ आधीच सेमी फायनलमध्ये पोहचले आहेत. दुसरीकडं न्यूझीलंड, श्रीलंका, बांगलादेश आणि पाकिस्तान या संघांना सेमी फायनलमध्ये प्रवेश करणं जमलं नाही.

भारतीय संघानं वर्ल्डकपची धडाकेबाज सुरूवात केली होती. त्यांनी श्रीलंका आणि पाकिस्तानवर विजय मिळवला होता. मात्र दक्षिण अफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड विरूद्धच्या सलग तीन




सामन्यात संघाला पराभवचं तोंड पहावं लागलं होतं. यामुळं टीम इंडियाच्या सेमी फायनल प्रवेशाच्या स्वप्नांना धक्का बसला होता.

न्यूझीलंडविरूद्धचा सामना हा करो या मरो स्थितीतला होता. या सामन्यात हरमनप्रीतच्या नेतृत्वाखील खेळणाऱ्या टीम इंडियानं चांगली कामगिरी केली. आता भारताचा लीग स्टेजम धला शेवटचा सामना हा बांगलादेशसोबत २६ ऑक्टोबरला होणार आहे.

दरम्यान, भारताचा सेमी फायनलमध्ये कोणाशी सामना होणार हे अजून निश्चित झालेलं नाही. भारत सध्या गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे. जर भारतानं बांगलादेशविरूद्धचा सामना जिंकला तर भारताला गुणतालिकेत पहिल्या स्थानावर असलेल्या संघासोबत सेमी फायनल खेळायची आहे.

दुसरीकडं ११ गुण असलेली ऑस्ट्रेलिया आणि १० गुण असलेली दक्षिण अफ्रिका यांच्यात होणाऱ्या सामन्यावर भारत सेमी फायनलमध्ये कोणासोबत खेळणार हे ठरणार आहे. ऑस्ट्रेलिया गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातील सामना हा २५ ऑक्टोबरला होणार आहे. या दोघांमधील कोणता संघ प्रथम स्थानावर येईल तो सेमी फायनलमध्ये भारतासोबत खेळेल.

## इंडिजवर बांगलादेशातही नामुष्की

**येओसू (कोरिया) :** भारतापाठोपाठ बांगलादेशातही वेस्ट इंडिजवर म नहानीकारक पराभवाची नामुष्की ओढवली. तिसऱ्या आणि अंतिम वनडेत बांगलादेशने २९६ धावांची मजल मारली. प्रत्युत्तरादाखल खेळताना वेस्ट इंडिजचा डाव ११७ धावांतच आटोपला. बांगलादेशने तीन सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली. बांगलादेशचा वनडे प्रकारातला दुसरा सर्वोत्तम विजय आहे.

बांगलादेशने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. सौम्या सरकारने ९१ तर सैफ हसनने ८० धावांची खेळी केली. या दोघांनी १७६ धावांची खणखणीत सलामी दिली. मात्र या दोघांनंतर बांगलादेशच्या पुढच्या फलंदाजांना मोठ्या खेळी करता आल्या नाहीत. नझमुल शंटोने ४४ धावा केल्या. वेस्ट इंडिजतर्फे अकेल हुसेनने ४ विकेट्स पटकावल्या.

वेस्ट इंडिजने या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना सपशेल शरणागती




पत्करली. १०व्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या अकेल हुसेनने केलेल्या २७ धावा वेस्ट इंडिजच्या डावातील सर्वोच्च धावसंख्या होती. बांगलादेशतर्फे नसुम अहमद आणि रिषाद हुसेन यांनी प्रत्येकी ३ तर मेहदी हसन मिराझ आणि तन्वीर इस्लामने प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. ३०.१ षटकातच वेस्ट इंडिजचा डाव आटोपला.

## दुसऱ्या कसोटीमध्ये पाकिस्तान पराभूत

**लाहोर :** पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सुरू असलेल्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने पाकिस्तानवर आठ गडी राखून दणदणीत विजय मिळवला. या सामन्यात पाकिस्तानने दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी ६८ धावांचं आव्हान ठेवलं होतं. त्याचा दक्षिण आफ्रिकेने सहजपणे पाठलाग केला. दरम्यान, दक्षिण आफ्रिकेने पाकिस्तानवर मिळवलेल्या या विजयामुळे आयसीसी कसोटी अजिंक्यपद स्पर्धेतील गुणतालिकेत मोठी उलथापालथ झाली आहे. तसेच पाकिस्तानच्या झालेल्या पराभवामुळे भारताला मोठा फायदा झाला आहे.

दक्षिण आफ्रिकेने सुमारे १८ वर्षांनंतर पाकिस्तानमध्ये कसोटी सामना जिंकला आहे. तसेच आयसीसी कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या २०२५ ते २०२७ च्या फेरीमधील दक्षिण आफ्रिकेचा हा पहिला विजय ठरला आहे. या विजयाबरोबरच दक्षिण आफ्रिकेने कसोटी मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली आहे. या मालिकेतील पहिल्या सामन्याक पाकिस्तानने ९३ धावांनी विजय मिळवला होता. दक्षिण आफ्रिकेने मिळवलेल्या विजयामुळे आयसीसी कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतक्त्यात मोठा फेरबदल झाला आहे. लाहोर येथे झालेल्या पहिल्या कसोटीत दक्षिण आफ्रिकेवर मिळवलेल्या विजयाच्या जोरावर




पाकिस्तानचा संघ दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला होता. मात्र आजच्या पराभवामुळे पाकिस्तानची थेट पाचव्या क्रमांकावर घसरण झाली आहे. पाकिस्तानच्या खात्यात आता दोन साम न्यांमधून एक विजय आणि एका पराभवासह एकूण ५० टक्के गुण आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या खात्यातही ५० टक्के गुण आहेत. म त्र सरस सरासरीच्या जोरावर त्यांनी चौथं स्थान पटकावलं आहे.

मात्र दक्षिण आफ्रिकेने आज मिळवलेल्या विजयाचा खरा फायदा हा भारतीय संघाला झाला आहे. भारतीय संघ आता आयसीसी कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या क्रमवारीत तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे. भारतीय संघाच्या खात्यात ७ सामन्यातून चार विजयांसह ६१.९० टक्के गुण आहेत. तर या क्रमवारीत ऑस्ट्रेलिया पहिल्या, तर श्रीलंका दुसऱ्या स्थानी आहे.

## ऑस्ट्रेलियाने भारताचा केला दोन गडी राखून पराभव

**नवी दिल्ली :** अडलेडमध्ये खेळलेल्या दुसऱ्या वनडेमध्ये भारतीय संघाने झुंजार लढत दिली, पण शेवटच्या टप्प्यात ऑस्ट्रेलियन फलंदाजांनी उत्तम खेळ करत सामना जिंकला. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्शने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताने प्रथम फलंदाजी करताना रोहित शर्मा (७३), श्रेयस अय्यर (६१) आणि अक्षर पटेल (४४) यांच्या खेळींच्या जोरावर ऑस्ट्रेलियाला २६५ धावांचे आव्हान दिले. याचा पाठलाग करताना मॅथ्यू शॉर्ट (७४), कूपर कोनॉली (नाबाद ६१) आणि मिचेल ओवन (३६) यांच्या फटकेबाजीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने सामना जिंकला. यामुळे तीन सामन्यांच्या मालिकेत ऑस्ट्रेलियाने २-०ची आघाडी घेतली.

भारताने प्रथम फलंदाजी करताना ५० ओव्हरमध्ये ९ विकेट्स गमावून २६४ धावा केल्या. पहिल्या दोन विकेट्स फारच पटकन गेल्या. विराट कोहली पुन्हा शून्यावर बाद झाला. त्यानंतर रोहित शर्मा आणि श्रेयस अय्यर जोडीने संघाला मोठी धावसंख्या गाठून देण्यात मदत केली. या दोघांच्या नंतर अक्षर पटेलने फटकेबाजी करत संघाची धावगती सुधारली. तर तळात हर्षित राणा आणि अर्शदीप सिंग यांनी फलंदाजी करत संघाला अडीचशेपार नेले. ऑस्ट्रेलियाकडून झम्पाने ४, बार्टलेटने ३ तर स्टार्कने २ बळी घेतले. ऑस्ट्रेलियाने २६५ धावांचे आव्हान अवघ्या ४६.२ षटकांतच पूर्ण केले आणि २ विकेट्सने सामना जिंकला. ऑस्ट्रेलियाची सुरुवातही संथ झाली होती. मार्श आणि हेड स्वस्तात बाद झाले होते.

पण मॅथ्यू शॉर्ट आणि कूपर कोनॉली या दोघांनी संघाला स्थैर्य दिले. दोघांनीही शांत आणि संयमी फलंदाजी करत खेळपट्टीवर जम बसवला. नंतर त्यांनी फटकेबाजीला सुरूवात केली. शॉर्ट बाद झाल्यानंतर कोनॉलीला मिचेल ओवनची साथ मिळाली. ओवन तडाखेबंद फटकेबाजी करत संघाला विजयासमीप आणले. अखेर कूपर कोनॉलीने नाबाद राहत संघाला विजय मिळवून दिला. भारताकडून सुंदर, अर्शदीप आणि हर्षित तिघांनीही २-२ बळी मिळवले.



# अभिनेत्रीने सुरू केला कॅफे, उषा नाडकर्णींनी केलं उद्घाटन

**मुंबई :** मनोरंजन विश्वातील अनेक कलाकार मंडळी आता अभिनयासह उद्योग क्षेत्रातही पाऊल टाकत आहेत. मराठीसह हिंदी कलाविश्वातील अनेक कलाकारांनी अभिनय क्षेत्रात कार्यरत असण्याबरोबरच उद्योग क्षेत्रात आपली नवी सुरुवात केली आहे. कोणी स्वत:चा साड्यांचा ब्रँड, कुणी दागिन्यांचा ब्रँड, कुणी स्वत:चं सेलॉन सुरू केलं, तर कुणी स्वत:चं हॉटेल.

अशातच आता यात आणखी एका लोकप्रिय टीव्ही अभिनेत्रीची भर पडली आहे, ही अभिनेत्री म्हणजे अर्चना गौतम. बिग बॉस १६ आणि 'सेलिब्रिटी मास्टरशेफ' या शोमधून प्रसिद्धीझोतात आलेली अर्चना गौतम आता बिझनेसवूमन झाली आहे. अभिनेत्रीने नुकतंच स्वत:चा कॅफे सुरू केला आहे. दिवाळीच्या शुभमुहूर्तावर तिनं आपल्या या नवीन कॅफेची सुरुवात केली आहे.

र्चनानं सुरू केलेल्या या नवीन कॅफेचं उद्घाटन ज्येष्ठ मराठी अभिनेत्री उषा नाडकर्णी यांच्या हस्ते पार पडलं. याचे काही खास फोटो अर्चनानं आपल्या सोशल मीडिया अकाउंटद्वारे शेअर केले आहेत. तसंच अर्चनानं उषा नाडकर्णींचे आभारही मानले आहेत. अर्चना म्हणते, जे लोक आपले असतात,



ते नेहमीच आपल्याशी मनानं जोडलेले राहतात. उषा नाडकर्णी तुमचे मनःपूर्वक आभार. दिवाळीच्या शुभप्रसंगी Oye Churros कॅफेचे उद्घाटन तुमच्या हातून झालं ही आमच्यासाठी आनंदाची आणि सन्मानाची गोष्ट आहे. या नव्या प्रवासासाठी तुमचे आशीर्वाद मिळणं, ही खूप सुंदर सुरुवात आहे.

अर्चनानं शेअर केलेल्या या नव्या कॅफेच्या फोटोंवर प्रेक्षकांनी कमेंट्सद्वारे तिचं कौतुक केलं आहे. तसंच तिच्या या नव्या सुरुवातीसाठी तिला खास शुभेच्छाही दिल्या आहेत. दरम्यान, बिझनेसवूमन झालेली अर्चना ही सध्याच्या लोकप्रिय टीव्ही अभिनेत्रींपैकी एक आहे. तिनं मॉडेल म्हणून आपल्या करिअरची सुरुवात केली. २०१५ मध्ये आलेल्या 'ग्रेट ग्रँड मस्ती' या बॉलीवूड चित्रपटातील एका छोट्या भूमिकेतून तिनं अभिनय क्षेत्रात पाऊल टाकलं. यानंतर तिनं 'हसीना पारकर' आणि 'बारात कंपनी'सारख्या चित्रपटांमध्येही काम केलं आहे.

चित्रपटांबरोबरच अर्चना 'साथ निभाना साथिया' आणि 'ये है आशिकी'सारख्या टीव्ही मालिकांमध्येही दिसली आहे. मालिका आणि चित्रपटांनंतर तिनं आपला मोर्चा रिॲलिटी शोकडे वळवला. ती 'बिग बॉस १६'मध्ये सहभागी झाली होती आणि नंतर 'खतरों के खिलाडी'मध्येही ती दिसली. शिवाय नुकताच तिनं 'सेलिब्रिटी मास्टरशेफ' हा शोदेखील केला. यानंतर आता अर्चनाने व्यवसाय क्षेत्रात आपली नवीन सुरुवात केली आहे. तिनं स्वत:चा कॅफे सुरू केला आहे.

## महेश कोठारे यांच्या समर्थनार्थ मेघा धाडेची पोस्ट चर्चेत

**मुंबई :** अलीकडेच अभिनेते, निर्माते महेश कोठारे यांच्या एका व्हायरल व्हीडियोनंतर जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत. या व्हीडियोमध्ये महेश कोठारे हे भाजपावर स्तुतिसुमने उधळताना दिसत आहेत. एका कार्यक्रमात त्यांनी मी मोदी भक्त आहे आणि मुंबई महापालिकेत कमळच फुलेल असे वक्तव्य केले. तसेच त्यांनी संजय राऊत आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यावरही टीका केली.



यानंतर महेश यांच्यावर अनेकानी टीका केल्या. पण अभिनेत्री मेघा धाडेने मात्र महेश यांची पाठराखण केली आहे. मेघा यांनी सोशल मीडिया पोस्ट केली आहे. ज्यात त्या म्हणतात, 'अभिनेत्री उर्मिला मातोंडकरने उध्दव सेना जॉइन केली होती तेव्हा कोणत्याही भाजप प्रवक्त्याने तिच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर आक्षेप घेतला नव्हता, सुप्रसिद्ध दिग्दर्शक महेश मांजरेकरने तर मनसेच्या तिकिटावर लोकसभा लढवली होती तरी कोणी आक्षेप घेतला नाही.

परंतु महेश कोठारेंनी मोदींची तारीफ केली की उध्दव सेनेला इंगळ्या डसल्या कोठारेंवर टीकेची झोड उठवली गेली ! त्यांच्या मराठीपणावर देखील शंका घेण्यात आली. हे असे झाले कारण कोठारे जे बोलले ते मनापासून बोलले कोणत्या तिकीटाच्या लालसेपोटी, कोणाचे पाकीट मिळवण्यासाठी ते असे बोलले नाही एक सामान्य मुंबईकरांची जी भावना आहे जो मुंबईकर आधी रस्त्यावर धक्के खायचा तो आता मेट्रोत गार वाऱ्यात वेगाने प्रवार, करतोय जो मुंबईकर आधी ट्रॅफिक मध्ये अडकायचा आता तो अटल सेतूवरून सुसाट धावतोय त्या मुंबईकरांच्या भावनांचे प्रगटीकरण कोठारेंच्या भाषणात झाले आणि म्हणूनच उध्दव सेनेच्या पायाखालची जमीन सरकली ! आणि हे सत्यात देखील उतरणार आहे.'या पोस्टवर अभिनेते शरद पोंक्षे यांनीही कमेंट केली आहे. ते आपल्या पोस्टमध्ये म्हणतात, मीही मोदांचं कौतुक करतो अमित शहांच कौतूक करतो.जेजे चांगले आहेत त्यांचं करतो. सद्य परिस्थितीत भाजप शिवाय देशाला पर्याय नाही माझं मत मांडले. द्या किती शिव्या द्यायच्यात त्या.' तर अनेकांनी या पोस्टवर तिने राजकारणात उतरु नये अशीही कमेंट केली आहे.

## हास्याचा फवारा घेऊन येणार किस किस को प्यार करु २

**मुंबई :** कॉमेडीयन कपिल शर्माचा नव्या चित्रपटाचे मोशन पोस्टर रिलीज झाले असून प्रदर्शनची तारीख आणि कलाकार देखील कोण असतील, हे कन्फर्म करण्यात आले आहे. कपिल शर्माचा किस किस को प्यार करू हा चित्रपट २०१५ मध्ये रिलीज झाला होता. आता पुन्हा मोठ्या पडद्यावर या चित्रपटाचा सीक्वल येतोय. निर्मात्यांनी चित्रपटाचे मोशन पोस्टर जारी करत रिलीज डेटची अधिकृत घोषणा केलीय.



चित्रपटाचे नवे पोस्टर नुकतेच रिलीज करण्यात आले असून त्यात कपिल शर्मा पुन्हा एकदा आपल्या खास स्टाईलमध्ये दिसत आहे. सोशल मीडियावर हा पोस्टर व्हायरल झालाय. 'किस किसको प्यार करूं' या चित्रपटात कपिलची तीन पत्नी आणि एक गर्लफ्रेंड अशा विनोदी गोंधळावर आधारित कथा होती. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत कपिलचा सिनेमॅटिक डेब्यू सुपरहिट ठरला होता. आता दुसऱ्या भागात कपिलच्या व्यक्तिरेखेत आणखी भन्नाट ट्विस्ट असणार असल्याचं दिग्दर्शकांनी सांगितलं आहे.

## थामा Vs एक दिवाने की दिवानियत, बॉक्स ऑफिसवर कोणता सिनेमा ठरला वरचढ?

**मुंबई :** सध्या बॉक्स ऑफिसवर 'एक दिवाने की दिवानियत' व 'थामा' या सिनेमांचा जलवा पाहायला मिळतोय. दोन्ही चित्रपटांना प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळतोय. त्यामुळे दोन्ही चित्रपट चांगली कामगिरी करत आहेत. २१ ऑक्टोबरला रिलीज झालेल्या 'एक दिवाने की दिवानियत' व 'थामा'ने तीन दिवसांत किती कमाई केली, ते जाणून घेऊयात.

आयुष्मान खुराना आणि रश्मिका मंदाना यांच्या 'थामा' या चित्रपटाने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक चित्रपटगृहांमध्ये गर्दी करत आहेत. या हॉरर कॉमेडीने रिलीजच्या फक्त तीन दिवसांतच जबरदस्त कमाई केली आहे. या चित्रपटाने अनेक सिनेमांचे रेकॉर्ड मोडले आहेत. सॅकनिल्कच्या आकडेवारीनुसार, 'थामा' ने रिलीजच्या पहिल्या दिवशी २४ कोटी कमावले. दुसऱ्या दिवशी थामाच्या कमाईत घसरण झाली आणि १८.६ कोटींचे कलेक्शन केले. थामाने रिलीजच्या तिसऱ्या दिवशी १२.५० कोटी कमावले. थामाचे तीन दिवसांचे कलेक्शन




५५.१० कोटींवर पोहोचले आहे.

थामाने काजोलच्या 'मा' सिनेमाच्या लाइफटाइम कलेक्शनला मागे टाकले आहे. 'मा' ने भारतात ३६.०८ कोटी आणि जगभरात ४९.७५ कोटी कमावले. आता थामा लवकरच वरुण धवनच्या 'भेडिया' ला मागे टाकेल. भेडियाने भारतात ६८.९९ कोटींचे कलेक्शन केले होते. सनम तेरी कसम फेम हर्षवर्धन राणे व सोनम बाजवा यांच्या 'एक दिवाने की दिवानियत'ने देखील बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली आहे. सिनेमाने पहिल्या दिवशी ९ कोटी कमावले, दुसऱ्या दिवशी ७.५ कोटी कमावले आणि तिसऱ्या दिवशी ६ कोटी रुपये कमावले. 'एक दिवाने की दिवानियत'चे तीन दिवसांचे कलेक्शन २२.७५ कोटी रुपये झाले आहे. 'एक दिवाने की दिवानियत'ने होमबाउंड (४.५७ कोटी), द बंगाल फाइल्स ९ (१९.५९ कोटी), निकिता रॉय (१.२८ कोटी), आंखों की गुस्ताखियां (१.८० कोटी), केसरी वीर (१.८८ कोटी), कंपकंपी (१.५० कोटी), द भूतनी (१२.५२ कोटी), फुले (६.७६ कोटी), ग्राउंड झिरो (७.७७ कोटी), क्रेझी (१४.०३ कोटी), सुपरबॉयज ऑफ मालेगाव (५.३२ कोटी), मेरे हसबंड की बीवी (१२.२५ कोटी), लव्हयापा (७.६९ कोटी) आणि इमर्जन्सी (२०.४८ कोटी) या चित्रपटांच्या लाइफटाइम कलेक्शनला मागे टाकलं आहे.

## हार्दिकने माहिकाचे रिलेशनशीप केले कन्फर्म!

**मुंबई :** भारतीय क्रिकेटपटू हार्दिक पांड्या पुन्हा एकदा चर्चेत आला आहे, मात्र या वेळी कारण क्रिकेट नव्हे तर त्याचं खासगी आयुष्य आहे. अलीकडेच हार्दिकने सोशल मीडियावर काही खास फोटो शेअर केले आहेत, ज्यातून त्याने मॉडेल माहीका शर्मासोबतचं नातं अधिकृत केल्याचं स्पष्ट होत आहे. क्रिकेट विश्वातील हा नवा 'लव्ह एंगल' सध्या सोशल मीडियावर ट्रेंड होत आहे. काही तासांतच फोटोंना लाखो लाईक्स आणि हजारो कमेंट्स मिळाल्या आहेत. हार्दिकचा हा रोमँटिक अंदाज पाहून चाहत्यांमध्ये चर्चेला उधाण आलं आहे. माहीका शर्मा ही ग्लॅमरस मॉडेल असून, तीने अनेक जाहिराती आणि म्युझिक व्हिडिओंमध्ये काम केलं आहे. दोघांच्या अफेअरच्या चर्चा काही आठवड्यांपासून सुरु होत्या, मात्र आता हार्दिकने स्वतः चं नातं ऑफिशियल केल्याने या चर्चांना पूर्णविराम लागला आहे. हार्दिक पांड्याने आधी अभिनेत्री नताशा स्टेनकोविकशी लग्न केले होते.

# खामगाव शहरात दोन चोरटे पकडले; ५० हजारांचा मुद्देमाल हस्तगत, गुन्हा दाखल....

जनसंचलन/ खामगाव

शहर पोलिसांच्या दक्षतेमुळे दोन सराईत चोरटे पोलिसांच्या जाळ्यात अडकले असून, त्यांनी अकोट (जि. अकोला) येथून ५० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची कबुली दिली आहे. त्यावरून पोलिसांनी मुद्देमाल हस्तगत करून गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी सुमारास खामगाव शहर पोलिस ठाण्याचे डीबी पथक एसबीआय बँकेजवळ पेट्रोलिंग करत असताना दोन व्यक्ती संशयास्पदरीत्या फिरताना दिसले. चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. तपासाअंती त्यांची ओळख सोनू उमाशंकर सिंग (३२, रा. राजगड, ता. मडीहान, जि. मिर्झापूर, उत्तर प्रदेश) आणि जिब्राल सनोद गुद्रावल (३०, रा. महात्मा फ ुलेनगर, टॉवर बिल्डिंग, ठाणे पश्चिम) अशी पटली. पोलिस तपासात समोर आले की, दोघेही विविध गुन्ह्यांमध्ये आधीपासूनच आरोपी आहेत. सोनू सिंग याच्यावर हरसूल व उस्मानपुरा (छ. संभाजीनगर) पोलिस ठाण्यांमध्ये चोरी, फसवणूक, बनावट कागदपत्र तयार करणे आदी गुन्हे नोंद आहेत. तर जिब्राल गुद्रावल याच्याविरुद्ध वरतकनगर पोलिस ठाण्यात घरफोडी हजार रुपयांच्या अकोट येथील चोरीची दिली कबुली. आणि मारहाणीचे गुन्हे नोंद आहेत. दोघांना विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्यांनी अकोट (जि. अकोला) येथे ५०,००० रुपये रोख रक्कम चोरी केल्याची कबुली दिली. अकोट पोलिसांनी याची खात्री केल्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी त्यांच्या ताब्यात देण्यात दोघांना आले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक निलेश तांबे, अपर अधीक्षक श्रेणिक लोढा, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक रामकृष्ण पवार यांनी केली.

# टाकरखेड शिवारातून म्हैस व बकऱ्या चोरी....

जनसंचलन/मोताळा

नांदुरा तालुक्यातील टाकरखेड शिवारात अज्ञात चोरट्यांनी गोठ्यात घुसून एक म्हैस आणि दोन बकऱ्या असा सुमारे ३५ हजारांचा माल लंपास केला. ही घटना २३ ऑक्टोबर रोजी सकाळी सातच्या सुमारास उघडकीस आली असून, बोराखेडी पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादी संतोष सुरेशसिंग राजपूत (रा. टाकरखेड, ता. नांदुरा) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या शेतशिवारातील गोठ्यात गुरे बांधलेली होती. २२ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास वडील सुरेशसिंग राजपूत यांनी दोन म्हशी आणि एक बकरी गोठ्यात बांधली होती. परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी पाहणी केली असता एक म्हैस आणि एक बकरी गायब असल्याचे आढळले. शेजारील अजय जाधव यांचेही पशुधन गायब होते.

# घरात घुसून मारहाण; चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल शेगाव तालुक्यातील पहुरजीरा येथील घटना

जनसंचलन/ खामगाव

शेगाव तालुक्यातील पहुरजीरा येथे जुन्या वादातून एकाला घरात घसून मारहाण करण्यात आली. ही घटना २२ ऑक्टोबर रोजी रात्री ९:३० वाजता घडली. याप्रकरणी तक्रारीवरून चौघांविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, प्रदीप संतोष गलसकार (२२, रा. पहुरजीरा) यांनी राहुल व्यवहारे, मनोज गजानन व्यवहारे, परशुराम व्यवहारे व श्रीकृष्ण व्यवहारे यांनी संगनमत करून घरात घुसून मारहाण केली असल्याचा आरोप केला. प्रेमविवाह केल्यानंतर गावात दिवाळी सुटीसाठी आलो असता, जुना वाद उकरून काढत ही मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत गलसकार यांनी सांगितले. स्वतः सह आपल्या पत्नीलाही मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारीवरून पोलिसांनी चार आरोपी विरोधात भारतीय न्याय संहितेतील कलमानुसार गुन्हा दाखल केला

# विवाहितेचा विनयभंग; बोराखेडीत गुन्हा दाखल...

जनसंचलन/मोताळा

तालुक्यातील एका गावात २४ वर्षीय विवाहितेचा विनयभंग झाल्याची घटना २१ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी साडेचारच्या सुमारास घडली. या प्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरून बोराखेडी पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, त्या दिवशी संध्याकाळी त्या किराणा दुकानात खरेदीसाठी गेल्या असता, गावातीलच श्रावण निना पानपाटील हा व्यक्ती तेथे आला आणि तू मला खूप आवडतेस असे म्हणत तिचा विनयभंग केला. घाबरलेल्या



महिलेनं तात्काळ आरडाओरडा केला. त्यावेळी गावातील एक नागरिक मदतीला आला आणि आरोपीने तेथून पळ काढला. या प्रकरणी पोलिसांनी श्रावण पानपाटील याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. घटनेचा पुढील तपास बोराखेडी पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत.

# रामराज्याच्या दिशेने नवे पाऊल : मिशन अयोध्या २४ जानेवारीपासून चित्रपटगृहात!

वृत्तसंस्था/मुंबई

अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या लोकार्पण वर्षपूर्तीचे औचित्य साधत, शुक्रवार २४ जानेवारी २०२५ पासून मिशन अयोध्या हा बहुचर्चित चित्रपट महाराष्ट्रभरातील १०० हून अधिक चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. प्रभू श्रीरामांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि त्यांच्या रामराज्याची संकल्पना पुढे नेण्यासाठी प्रेरणादायी ठरणारा हा चित्रपट त्याच्या सशक्त कथेमुळे प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यातही अव्वल आहे. निर्माते कृष्णा दादाराव शिंदे, सौ. योगिता कृष्णा शिंदे त्यांच्या आर के योगिनी फिल्म्स प्रॉडक्शन प्रा. लि. निर्मित ङ्गमिशन अयोध्याफ हा केवळ एक मनोरंजनात्मक चित्रपट नसून, रामभक्तांच्या हृदयातील प्रभू श्रीरामांशी जोडणारा आणि त्यांचे विचार नव्या पिढीपर्यंत नेणारा एक प्रेरणादाई प्रवास आहे. रामराज्याच्या संकल्पनेला नव्या दृष्टीने उलगडणाऱ्या या कलाकृतीतून एक महत्त्वाचा प्रश्न विचारला जातो: पुढच्या पिढ्यांना आपण कोणते प्रभू श्रीराम शिकवणार आहोत? रावणावर विजय मिळवणारे योध्दा राम, की रामराज्याच्या आदर्शाची स्थापना करणारे राजा राम? चित्रपटाबद्दल काय म्हणतात लेखक-दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे? प्रभू श्रीरामांच्या अयोध्येतील जन्मभूमीमुळे या मंदिराला जागतिक पातळीवर अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या राष्ट्रमंदिराने देशभरातील प्रत्येक रामभक्ताला एका धाग्यात जोडले आहे. आपण रामायण ऐकले, पाहिले; मात्र रामराज्याच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी सर्व भारतीयांनी एकत्र येण्याची गरज आहे. प्रभू श्रीराम हे कोणत्याही जाती-धर्मापुरते सीमित नाहीत; ते प्रत्येक भारतीयाचे आहेत. म्हणूनच, मिशन अयोध्या हा केवळ एक चित्रपट नाही, तर राष्ट्रमंदिराच्या संरक्षणाची आणि त्याच्या महत्त्वाची जाणीव जागवणारी प्रेरणादायी कलाकृती आहे,ङ्ग असे लेखक-दिग्दर्शक समीर रमेश सुर्वे यांनी सांगितले. येत्या शुक्रवारी प्रदर्शित होणारा बहुचर्चित मिशन अयोध्या हा चित्रपट पहिल्या चार दिवसात पाहणाऱ्या २५ भाग्यवान प्रेक्षकांना शीतल ट्रॅव्हल सोल्युशन्सद्वारे अयोध्यावारीची संधी मिळणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील हा चित्रपट पाहणारे प्रेक्षक या संधीचा फायदा घेऊ शकतात. पहिल्या ३ दिवसांत चित्रपटगृहात जाऊन सिनेमा पाहणाऱ्या प्रेक्षकांनी त्यांचा तिकीटासोबतचा सेल्फी फेसबुक किंवा इंस्टाग्रामवर




पोस्ट करून ला टॅग करून हा हॅशटॅग वापरायचा आहे. रामराज्याच्या संकल्पनेचा शोध घेणाऱ्या आणि प्रभू श्रीरामांच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या या महत्त्वाकांक्षी चित्रपटाला आपल्या कुटुंबासह नक्की या, आणि प्रभू श्रीरामांच्या विचारांचा भाग बना. २४ जानेवारी पासून मिशन अयोध्याच्या प्रेरणादायी प्रवासाचे साक्षीदार होऊन या मिशनमध्ये सामील होऊयात! जय श्रीराम!

# विवाहितेचा विनयभंग बोराखेडीत गुन्हा दाखल

**जनसंचलन/मोताळा**



तालुक्यातील एका गावात २४ वर्षीय विवाहितेचा विनयभंग झाल्याची घटना २१ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी साडेचारच्या सुमारास घडली. या प्रकरणी पीडित महिलेच्या फिर्यादीवरून बोराखेडी पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, त्या दिवशी संध्याकाळी त्या किराणा दुकानात खरेदीसाठी गेल्या असता, गावातीलच श्रावण निना पानपाटील हा व्यक्ती तेथे आला आणि तू मला खूप आवडतेस असे म्हणत तिचा विनयभंग केला. घाबरलेल्या महिलेनं तात्काळ आरडाओरडा केला. त्यावेळी गावातील एक नागरिक मदतीला आला आणि आरोपीने तेथून पळ काढला. या प्रकरणी पोलिसांनी श्रावण पानपाटील याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. घटनेचा पुढील तपास बोराखेडी पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत.

# पैशांसाठी विवाहितेचा छळ; सासरच्या पाच जणांविरुद्ध गुन्हा...

**जनसंचलन/मोताळा**

पैशांसाठी विवाहितेचा शारीरिक आणि मानसिक छळ केल्याप्रकरणी पाच सासरच्या जणांविरुद्ध बोराखेडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सुरेंद्रनगर (गुजरात) येथे घडली असून फिर्याद २४ वर्षीय संजीवनी आकाश कंजारिया यांनी दाखल केली आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, २३ नोव्हेंबर २०२१ रोजी तिचा विवाह आकाश महेश कंजारिया (रा. पर्तुगढ, जि. सुरेंद्रनगर, गुजरात) याच्यासोबत झाला. विवाहानंतर काही काळानंतर तिचा पती सततच्या त्रासाला कंटाळून केली बोरखेडी पोलिसात तक्रार आकाश महेश कंजारिया आणि सासू पायल महेश कंजारिया यांनी तिला वारंवार माहेरहून एक लाख रुपये आणण्याची मागणी केली. पीडितेने या मागणीस नकार दिला असता, तिचा शारीरिक आणि मानसिक छळ करण्यात आला. याशिवाय तिची नणंद सिमरन विजय तायडे, नणंदेचा पती विजय रमेश तायडे (दोघे रा. कासारखेड, ता. खामगाव), तसेच मावस सासू वंदना चंद्रशेखर गवई (रा. लोखंडपाळा, ता. खामगाव) हेही वारंवार सासरी येऊन पती व सासूला भडकावत असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या तक्रारीवरून बोराखेडी पोलिसांनी वरील पाच जणांविरुद्ध हुंडाबळी व मानसिक छळ या कलमांन्तये गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

# शिंदी येथील शेतकऱ्याची कर्जाला कंटाळून आत्महत्या

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

साखरखेर्डा कर्जबाजारीपणा आणि अतिवृष्टीच्या ताणाने साखरखेर्डा जवळील शिंदी येथील शिवाजी माणिकराव बुरकूल (वय ६५) या शेतकऱ्याने दिवाळीच्या दिवशी शेतातच विष प्राशन करून आत्महत्या केली. : शिवाजी बुरकूल हे २२ ऑक्टोबर रोजी सकाळी नेहमीप्रमाणे शेतात गेले होते. दुपारपर्यंत ते घरी न आल्याने मुलांनी शेताकडे जाऊन पाहणी केली असता ते शेतात बेशुद्ध अवस्थेत आढळले. त्यांच्या बाजूला कीटकनाशकाची बाटली पडलेली दिसून आली. तातडीने त्यांना साखरखेर्डा प्राथमिक आरोग्य केंद्रात



नेण्यात आले; तेथून बुलढाणा जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. मृत बुरकूल यांच्यावर एका खाजगी पतसंस्थेचे सुमारे तीन लाख रुपयांचे कर्ज होते. अलीकडेच कर्जफेडीसाठी संस्थेकडून नोटीस बजावण्यात आली होती. अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाल्याने त्यांच्याकडे कर्जफेडीची क्षमता नव्हती. ग्राम महसूल अधिकारी लखन राजपूत यांनी पंचनामा करून अहवाल तहसीलदार अजित दिवटे यांच्याकडे सादर केला आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न

**जनसंचलन/ खामगाव**

शेगाव तालुक्यातील एका गावात सात वर्षीय चिमुकलीला शेतात घेऊन जात अत्याचार करण्याचा प्रयत्न झाला. मात्र, मुलीचे आईवडील आणि गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतल्याने आरोपीने मुलीला सोडून दिले. बुधवारी ही घटना घडली. गावातीलच ५० वर्षीय व्यक्तीने हा प्रयत्न केला होता.

# दुचाकीच्या धडकेत तीन जण जखमी...

**जनसंचलन/बुलढाणा**

गणेशनगर परिसरात एका दुचाकीस्वाराने दिलेल्या धडकेत महिला व दोन लहान मुले जखमी झाल्याची घटना घडली. या प्रकरणी सुशीलराजे सुभाषराव देशमुख (वय ४२, रा. गणेशनगर) यांनी बुलढाणा पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास, देशमुख यांच्या पत्नी शेषाद्री देशमुख या आपल्या मुलगा श्रीमंत व मुलगी राजवीर यांच्यासह गणेशनगर पाटीजवळून जात असताना, एमएच-२८ क्यू-८९४० क्रमांकाच्या मोटरसायकलस्वाराने वेगात वाहन चालवत त्यांना धडक दिली. या अपघातात तिघेही जखमी झाले असून उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत. या घटनेप्रकरणी पोलिसांनी सदर दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा नोंदविला असून पुढील तपास पोलीस हवालदार संजीव जाधव हे करीत आहेत.

# शेलोडी ते गव्हाण रस्त्याची दुर्दशा....

**जनसंचलन/ खामगाव**

शेलोडी ते गव्हाण हा मुख्य शेतरस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून, या मार्गावरून शेतांपर्यंत जाणाऱ्या शेतकऱ्यांना दररोजच्या मोठ्या प्रवासात अडचणींना तोंड द्यावे लागते. पिंप्राळा आणि पिंपरी गवळी मार्गे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतांपर्यंत पोहोचणे कठीण बनले आहे. सध्या सोयाबीन काढणीचा हंगाम सुरू आहे आणि या काळात ट्रॅक्टर व इतर वाहने दररोज अनेक फेऱ्या मारतात. मात्र, रस्त्याच्या खराब स्थितीमुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. रस्त्यावर मोठ्या खड्ड्यांमुळे वाहने कधीही अपघाताच्या धोक्यात येऊ शकतात. चिखल आणि अपूर्ण बांधकामामुळे शेतकऱ्यांना वेळेवर पीक वाहतूक करणेदेखील जड जात आहे. जिल्ह्यातील २१२ रस्त्यांचे सुधारित काम लवकरच पूर्ण होईल, असा दावा केला जात आहे, मात्र शेलोडी ते गव्हाण रस्ता या यादीत समाविष्ट आहे का, असा स्थानिक सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. २१२ रस्त्यांच्या यादीत शेलोडी-गव्हाण रस्ता समाविष्ट करावा. तलावाच्या अर्धवट बांधकामामुळे व रोजगार हमी योजनेतील निधीचा योग्य वापर न झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. मातोश्री ग्राम समृद्धी शेतरस्ते योजना आणि रोजगार हमी योजनेतून या रस्त्याचे काम सुरू करावे, अशी मागणी आहे.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८